भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.२८२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/०४/२०१७

१) जमिनीच्या वादावरून भांडण,करून काठीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :-

दिनांक १८/४/१७ चे ०७.०० वा. दरम्यान यातिल फिर्यादी व आरोपी चे शेतीचे जमिनीचा वाद असुन कोर्टात केस सुरू आहे त्यावरून आरोपीने भांडण करून हातातील काठी हिसकाऊन त्याचे डावे हाताचे मनगटावर व डावे पायाचे पोटरीवर मारून जखमी केल्याने फिर्यादी बळीराम नत्थुजी शिवनकर वय ७६ वर्ष रा. पालेपेंढरी यांचे तोंडी व डॉक्टरी एक्सरे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२५ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. राऊत पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

२) बिना परवाना डि.जे.साऊंड लावुन बाजवितांनी मिळनु आल्याने गुन्हा नोंद :-

दिनांक २१/०४/२०१७ चे ११.३० ते १२.०० वा. दरम्यान यातील आरोपीने आर.एम.पटेल कॉलेज रोडवर बिना परवाना डिजे सांऊड लाऊन वाजवितांना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी स.फौ. महालगावे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १३४ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास स.फौ. महालगावे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

३) सार्वजनिक ठिकाणी धोकादायक रित्या व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभे करून ठेवल्याने गुन्हा नोंद:-

दिनांक २१/०४/०१७ चे ०९.०० ते ११.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन आमरोडवर उभे करून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना व वाहणांना अडथळा होईल अशा स्थितीत उथी करून मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. खडसे पो.स्टे. साकोली यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. साकोली येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. खडसे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

४) सार्वजनिक ठिकाणी धोकादायक रित्या व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभे करून ठेवल्याने गुन्हा नोंद:-

दिनांक २१/०४/०१७ चे १७.०० ते १७.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन आमरोडवर उभे करून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना व वाहणांना अडथळा होईल अशा स्थितीत उथी करून मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. खडसे पो.स्टे. साकोली यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. साकोली येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

५) मंगलमुर्ती कार्यालय येथुन मोटार सायकल चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २१/०४/२०१७ चे १८.१० ते २०.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादीने आपली हिरो होंडा स्प्लेंडर प्लस काळया रंगाची मोटरसायकल बिना नंबरची कि.५०,४००/–रू.ची मंगलमुर्ती मंगल 'कार्यालय सेंदुरवाफा येथे घराशेजारील राहणाऱ्या मुलीचे लग्न कार्यक्रमाकरीता गेले व मोटरसायकल सभागृहाचे समोर उभे करून लग्न कार्यक्रमात गेले व लग्न कार्यक्रम आटोपल्याने मोटरसायकल ठेवलेल्या ठिकानी येवुन पाहीले असता मोटरसायकल दिसुन आली नाही कुनीतरी अज्ञात चोराने कुनिही नसल्याची संधी साधुन मोटरसायकल चोरून नेल्याने फिर्यादी नमिद रेशिम खुने वय २५ वर्ष रा. श्रीनगर कॉलनी सेंदुरवाफा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. भजने पो.स्टे. साकोली हे करीत आहेत

६) मंगलमुर्ती सभागृह येथुन मोटार सायकल चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २१/०४/२०१७ चे १८.४५ ते २०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीने आपली मोटार सायकल क्रमांक एमएच. ३६ एम ५६२३ कि. १८,०००/–रू. डिस्कव्हर कंपनीची मंगलमुर्ती मंगल कार्यालय सभागृह सेंदुरवाफा येथे समोर उभी करून काकाचे मुलीचे लग्नाला गेला असता व कार्यक्रम आटपुन मोटरसायकल ठेवलेल्या ठिकानी जावुन पाहीले असता मोटरसायकल दिसुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोराने कुनिही नसल्याची संधी साधुन मोटरसायकल चोरून नेल्याने फिर्यादी फिर्यादी सुभम प्रभु कापगते वय २२ वर्ष रा. वलमाझरी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. भजने पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

७) स्वताचे घरी पायरीवरून खाली पडल्याने डोक्याला मार लागल्याने औषधोपचारा दरम्यान मृत्यु . :– दिनांक ०६/०४/२०१७ चे १५.०० वा दरम्यान यातील मृतक जयदेव बळीराम सुखदेवे वय ७० वर्ष रा. मळेघाट हे स्वताचे राहते घरी पायरीवरून खाली पडुन डोक्याला मार लागल्याने त्यास औषधोपचारा करिता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो.स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र.००/१७ कलम १७४ जा.फौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने पो.स्टे.ला सरतर्फे फिर्यादी पो.ना. गिऱ्हेपुंजे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ.चा नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा.उईके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहे.

८) ट्रॅव्हल्स बस ने लग्नाकरिता जात असता अचानक प्रकृती खराब झाल्याने औषधोपचारा दरम्यान मृत्यु . :– दिनांक २१/०४/२०१७ चे ०८.३० वा दरम्यान यातील मृतक गजानन बाबुराव चुटे वय ५२ वर्ष रा. संगम पुर्नवसन हा दिनांक १७/४/१७ चे ०८.०० वा. दरम्यान ट्रॅव्हल्स बस ने लग्नाकरिता जात असता अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करिता सामान्य रूग्णालय भंडारा येथे नेले असता तेथील डॉक्टरने तपासुन मरण पावल्याचे घोषीत केल्याने डॉक्टरी मेमो वरून व मृतकचे भासाचे बयानावरून सरतर्फे फिर्यादी पो.हवा. फुंडे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ.चा मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास स.फौ. कन्नाके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-

- दिनांक २१/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुन ९२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०७, तीन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

स.पो.नि.मनोज काळबांधे
पोलीस नियत्रंन कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र.९५७९४३०४४२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.